e-Library Science Research Journal
International Recognition
ISSN: 2319-8435 Impact Factor : 2.2030(UIF) Volume - 5 | Issue - 5 | March - 2016

# " भारतातील बौद्ध धम्माचेपुनरूत्थान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान"




संदेश वाघ
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ.

### 1. प्रस्तावना:

२५५६ वर्षापूर्वी तथागत भगवान गौतम बुद्धाच्या संबोधी साक्षात्कार प्रभावाने भारतात जगाच्या पाठीवर प्रथमच आषाढ पौर्णिमेला 'धम्मचक्कप्पवतन' झाले. २५५६ वर्षापूर्वी झालेले. धम्मचक्रप्रवर्तन हे निसर्गात धम्मस्थापण्याची पहीही ऐतिहासिक घटना होती.

भगवान बुद्धांच्या धम्मस्थापणेने संपूर्ण भारतभूमीत एक नवीन विचार, 'धम्म' स्वरूपात स्थापण झाला. प्राचीन 'जंबुद्विप' व वर्तमान. भारत प्राचीन काळात 'बुद्धभूमि' म्हणून संपूर्ण विश्वात प्रसिद्धी झाली. प्राचीन भारतातील संपूर्ण भारतीय समान हा बुद्धांच्या प्रभावाखाली 'बौद्ध' म्हणून मोठया आनंदाने जीवन जगत होता. वयाच्या ८०व्या वर्षी तथागत भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले. तथागत भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले. तथागत भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर अनेक शेकडो वर्षानंतरही भारतभूमित बुद्ध विचारांचा प्रभाव टिकून होता. परंतू काही कालांतरानंतर हळू हळू भारतातील बौद्ध धम्मास ऱ्हासपर्व प्रारंभ झाला. जनसामान्य मानवाच्या आचरणावून बौद्धतत्वज्ञान नाहीशे होवू लागले. भारतातील अनैसर्गिक तत्वांचे अस्तित्व मानणनाऱ्या कर्मकांड आणि देहदंड – यज्ञयाग, या अधार्मिक परंपरेचा जोमाने प्रचार-प्रसार झाला.

बौद्ध धम्माचा प्रचार – प्रसार करणाऱ्या बौद्ध भिक्खु संघाची संख्या हळूहळू नष्ट होण्याच्या मार्गावर होती. बौद्धानुयायी

म्हणून जनसामान्यांची संख्या जवळ - जवळ संपूष्टात आली होती. कुठे तरी जंगलात-एकांतात भिक्खु म्हणून जीवन जगणारे साधक होते. परंतु राहीलेल्या भिक्खुंचा आणि जनसामान्यांचा प्रत्यक्ष सहवास आणि संवाद राहीला नव्हता. प्राचीन जंबूद्विपातून बुद्ध प्रभाव संपूष्टात येण्याच्या अवस्थेला पोहचला होता.

### *द्वितीय धम्मचक्र परिवर्तनः*

भगवान बुद्ध हयातीत असतांना बौद्ध धम्मास व्यापर सर्माणि आणि राजाश्रय प्राप्त झाला होता. समाजाच्या या दोन्ही महत्वपूर्ण व धन आणि सत्ता या दोन साधन प्रभावाने भारतातील बौद्ध धम्म टिकून होता. संपुष्टात आलेला भारतातील बौद्ध धम्म टिकून होता. संपुष्टात आलेला भारतातील बौद्ध धम्म पुन्हा स्थापीत होण्यसाठी भारतात बौद्ध धम्मास 'राजश्रायाची गरज होती.'

भारत भूमित घडलेले ऐतिहासिक व सर्वात मुरब्बी, मोठे युद्ध म्हणजे चक्रवर्ती सम्राट अशोकाचे 'कलींग' युद्ध न भूतो न भविष्यती आशा स्वरूपात झालेल्या कलींग युद्धात मोठया प्रभावत मानवसंहार झाला. लाखो सैनिकांच्या विधवा स्त्रिया आणि आपत्या स्नेही यांचा आक्रोश याचा चक्रवर्ती सम्राट अशोकाच्या मनावर खोलवर मोठा गंभीर परिणाम झाला. कलींग युद्ध जिंकूनही राजासम्राट अशोक अत्यंत बैचेन मनस्थितीत होता. त्याच्या मनाला शांती हवी होती, अशा बैचेन मानसिक अवस्थेत त्याला एका भिक्खुद्वारे सुंदर आणि ते बुद्धवचन एका गाथास्वरूपात होते.

'' नहि वेरेण वेराणि, सम्मतिद्धं कुदाय नं!
अ वेरेणच समति, ऐस धम्मो सनंतनो ।''
'धम्मपदं' क्कोद्धवग्गो -

अर्थः वैराने वैरत्व कधीच शमत नाही,
वैरत्वास अवैरानेच (मैत्री) जिंकता येते,
हाय निसर्गाचा सनातन मार्ग आहे.

भिक्खुंद्वारा वदन झालेल्या या गाथेचा अत्यंत सकारात्मक परिणाम सम्राट अशोकाच्या मनावर झाला. या उद्द्विग्न मानसिक अवस्थेतून बाहेर पडण्याचा हा ऐकमेव मार्ग आहे, असा राजाचा मनोदय निर्माण झाला. राजासम्राट अशोक दीर्घ बुद्ध तत्वज्ञान ऐकुन संपूर्ण बदलून गेला राजा सम्राट अशोकाने 'युद्धाचा मार्ग त्याग करून, बुद्ध मार्गाचा स्विकार केला' असे राजनिवेदनाद्वारे संपूर्ण जनतेस जाहीर करण्यात आले.

राजा सम्राट अशोकाने तलवारीचा त्याग करून अहिंसक बौद्ध - धम्माचा स्विकार केला. राजा सम्राट अशोकाच्या रूपाने अनेक वर्षानंतर बौद्ध धम्मास 'राजाश्रय' मिळाला. राजा सम्राट अशोकाने बौद्ध धम्माचा स्विकार केल्यामुळे संपूर्ण भारतवर्षातील मौर्य साम्राज्याविन नागरीकांनी बौद्ध धम्माचा स्विकार केला. संपूर्ण भारतवर्ष राजा सम्राटाच्या धउम्मस्विकारामुळे बुद्धमय - भारत म्हणून स्थापीत झाले. ते बुद्धानंतर इतिहासात घटलेले पहिलेच धम्मचक्र परिवर्तन होते.

राजा सम्राट अशोकाने बौद्ध धम्माच्या प्रचार - प्रसाराकरीता लाखो बौद्ध-भिक्खु आणि ८४,००० हजार संघाराम, स्तूब, शिलालेख आणि बुद्ध विहाराची स्थापणा केली, सम्राट अशोकाने स्वतःचा ऐकुलता एक मुलगा राजकुमार 'महेंद्र व पुत्री राजकुमारी संघमित्रा यांना भिक्खु संघात सामिल केले. या सम्राटाच्या अनमोल योदानाने बौद्ध धम्मास बुद्धानंतर प्रथमच 'सुवर्णयुग' प्राप्त झाले होते. बुद्ध सहवासानंतर पुन्हाएकदा भारत बौद्धमय भारत म्हणून उदयास आला.

चार्तुवर्ण व्यवस्थेला समाज बळी पडला. सामाजिक विषमतेच्या विचाराणे प्रभावित झालेला समाजाचा एक मोठा वर्ग अस्पृश्य म्हणून समाजव्यवस्थेत निर्माण करण्यात आला. बुद्ध विचार मानणारा भारतीय समाज बौद्ध म्हणून अस्तित्वात राहीला नाही. स्थापित बौद्ध परंपरेच्या प्राचीन वास्तूंचे रूपांतर अन्य मान्यतांच्या श्रद्धास्थानास करण्यात आले. सामाजिक विषमता स्थापीत झाल्यामुळे मानवा - मानवात भेदभाव अस्पृश्यता भाव उच्च - निचता निर्माण झाली. अस्पृश्य म्हणून वागविल्या जाणाऱ्या समाजास. मानव म्हणून लागणाऱ्या मूलभुत गरजां व नैसर्गिक संसाधानापासून वंचीत ठेवण्यात आले. अस्पृश्य समाज शतकानुशतके आर्थिक, सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतीक धार्मिक आशा सर्वांगीने विकासापासून पूर्णपणे अलिप्त होता.

अस्पृश्य समाजाच्या आशा अन्यायकारी - विषमतावादी अवस्थेत असतांना १४ एप्रिल १८९१ साली, रामजी सुभेदार यांच्या पोटी एक वुत्र जन्मास आला. नाव होते भिमराव रामजी आंबेडकर. भिमराव बालपणापासुनच सामाजिक विषमतेच्या अमानवीय कटु अनुभवाने व्यथित झाला होता. शैक्षणिक विषमतेच्या अन्यायकारी या व्यवस्थेने अस्पृशांनी शाळेच्या बाहेर बसून शिक्षण घेणे सक्तीचे केले होते. या अन्याया प्रती मोठे गंभीर प्रश्न भिमराव यांच्या मनात निर्माण झाला. या विषमतावादी चार वर्णव्यवस्थेचा मोठा गंभीर आघात त्यांच्या बालमनावर उमटला. त्यांच्या शालेय जीवनातील आचार्य केळुसकर गुरूजी यांनी भिमराव यांस 'भगवान गौतम बुद्ध चरि.' हे पुस्तक भेट दिले होते.

गौतम बुद्ध चरित्राचे वाचन करून भिमराव यांचे मन एकदम भारावून गेले. भगवान बुद्धांनी मानवा-मानवात कधीच भेद निर्माण केला नाही. सर्व मानव प्राणी समान आहेत. अहिंसा हे सत्य वर्तन आहे. शीला हा उत्तम जीवनमार्ग आहे. विज्ञान आणि निसर्ग नियम यांचा उत्तम संयोग करून बुद्धांनी बुद्धतत्वज्ञाची मांडणी केली आहे. ऐकीकडे वर्ण भेद आणि दुसरीकडे समतावादी, मानवतावादी निसर्गनिमांचा सन्माण करणारे श्रेष्ठ बुद्धवचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन प्रभावीत झाले. बुद्ध तत्वज्ञानाचा सहवास आणि मानवतेवरील निस्सिम प्रेम हे डॉ. बाबासाहेबांच्या जन्मतःच त्यांना प्राप्त झालेली पारमिता होती.

भविष्यात (पुढे चालून) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील अस्पृश्यता निवारणाचा फुले - शाहु यांच्या

अपूर्ण कामास पूर्णत्वाकडे नेले. भारतीय अस्पृश्यतांचे भारतीय समाजातून समूळ उच्चाटन करून टाकणे हे त्यांच्या कार्यचे अंतीम साध्य होते. भारतात पुन्हा एकदा 'समता' स्थापण करून विषमता नष्ट करण्यासाठी तथागत भगवान बुध्द स्थापीत समता प्रेमी प्राचीन भारताचा लोकप्रिय ''बौद्ध धम्म'' भारतात पुन्हा स्थापण करावा लागेल हे डॉ. बाबासहोब यांना समजले होते आणि म्हणूनच डॉ. बाबासहोब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ साली येवला मुक्कामी घोषणा केली की, ''मी हिंदू म्हणून जन्माला हे माझ्या हातचे नव्हते, परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही हे माझ्या हातात आहे.'' विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करून समताप्रेमी 'बौद्ध-धम्माचा' स्विकार करण्याचे सुतोवाच डॉ. बाबासाहेबांनी १९३५ लाच जाहीर केले होते.

१३ ऑक्टोबर १९३५ ते १४ ऑक्टो. १९५६ या २१ वर्षाच्या कलखंडात डॉ. बाबासाहेबांनी समग्र बौद्ध तत्वज्ञाचा अभ्यास केला. प्राचीन भारतातील बौद्धव धम्माच्या प्रभावाचा व लोक स्विकाराचा ऐतिहासिक अभ्याास केला. राजा सम्राट चक्रवर्ती अशोकांच्या द्वारा स्थापीत अनेक बुध्द लेण्यांना भेट देणे त्यांचा अभ्यास करणे. भगवान बुद्धांच्या पालि तत्वज्ञानास शिलालेखातील प्रभावाने जानले. भगवान बुध्द आणि सम्राट अशोक काळत बौद्ध धम्मास प्राप्त झालेला 'राजाधय' हे त्यांनी अभ्यासक दृष्टीने जानले. बौद्ध धम्मास पुन्हा एकदा भारतात स्थापण करून विमान भारतीय समाजात 'समता' स्थापण करण्याचा संकल्प डॉ. बाबासाहेबांनी जवळ जवळ २१ वर्षे देश - विदेशातील स्थापित बौद्ध परंपरेचा अभ्यास. श्रीलंका येथे वास्तव्य करून डॉ. बाबासाहेबांनी प्राचीन बौद्धव परंपरा 'थेरवाद' समजुन घेतला. स्वतः त्यांनी बुद्धमूर्ती व तैलचित्र तयार केले. हिंदू धर्माचा त्याग करून त्यांनी बौद्ध तत्वज्ञानाचा पूर्णताः आचरणिक स्विकार केला. समतावादी बुद्धविचारांचा आधार घेवून मानवतावांदाचे अनेक अहिंसक लदे त्यांनी उभारले. चवदात तळयाचा महाड येथिल २० मार्च १९२७ चा पाण्याचा सत्याग्रह काळाराम येथील मंदीर प्रवेशासाठी नाशिक काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह बहिष्कृत हितकारणी सभा, पहिली अस्पृश्यांची मानगांव येथील 'अस्पृश्य परिषद' अशा अनेक समाज परिवर्तणाच्या' लढयास बुध्द मार्गाने बाबांनी यशस्वी करून दाखवीले. चार्तुवर्ण व्यवस्थेने प्रचंड विस्कळीत झालेल्या समग्र स्वतंत्र भारतीय समाजास बौद्ध तत्वज्ञानाशिवाय तरणोवाय नाही अशी घोषणा वजा आव्हनच त्यांनी केले.

### *जाहीर धर्मांतरः*

१९५६ सालापर्यंत डॉ. बाबासाहेबांनी स्वतंत्र भारताची आणि समग्र भारतीय अस्पृश्य समाजाची सेवा केली. सार्वजनिक जीवनात शुद्ध चरित्र्याचा प्रचंड विद्वान, दुरूदृष्टीवान, समाजप्रवर्तक म्हणून देशात - विदेशात त्यांच प्रभाव पोहचला १३ ऑक्टोबर १९३५ साली दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी आता मी बौद्ध धम्माचा स्विकार करणार'' असे त्यांनी जाहीर केले. '' १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी मी बौद्ध धम्माचा स्विकार करणार, ज्यांना - ज्यांना अस्पृश्यतेचा त्याग करून समताप्रेमी बौद्ध धम्माचा स्विकार करायचा आहे त्यांनी माझ्याबरोबर नागपूरला चला'' असे समग्र भारतीय अस्पृश्य समाजास त्यांनी आव्हान केले.

डॉ. बाबासाहेबांच्या आव्हानाचा सन्माण करीपत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी भारतीय अस्पृश्य समाजाचा एक मोठा वर्ग नागपूर येथे जमा झाला. पू. भदन्त गुरू चंद्रमणी, महाथेरो व अन्य आशा पाच वरिष्ठ बौद्ध भिक्खु संघाच्या उपस्थित प्रथम स्वंय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व त्यांच्या पत्नी सविता आंबेडकर यांनी त्रिशरण - पंचशील ग्रहण करून बौद्ध धम्माचा स्विकार केला. काही क्षणातच उर्ववीत पाच लक्ष अस्पृश्य भारतीयांस बौद्ध धम्माची दीक्षा देण्यासाठी स्वतः बाबासाहेब उभे राहिले. ''ज्यांना -ज्यांना बौद्ध धम्माचा स्विकार करायचा आहे, त्यांनी त्यांनी हात वर करा'' असे उद्गार बाबासाहेबांच्या मुखातून बाहेर पडताच पाच लाख लोकांनी आपले दोन्ही ही हात वर करून आपली सकारात्मकता दर्शवीली.

जमलेल्या पाच लाख जन समुदायास स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्रिशरण, पंचशील आणि २२ प्रतिज्ञा देवून बौद्ध धम्माची दीक्षा दिली आणि जगातले तीसरे 'धम्म चक्र परिवर्तन' घडले. पाच लाख लोकांनी एकाच ठिकाणी, एकाच व्यक्तीच्या हाकेला हाक देवून, एकत्र एकाच सुरात बुद्धं सरंण गच्छामि।

धम्मं सरणं गच्छामि ।
संघ सरणं गच्छामि।

म्हणून बौद्ध धम्माचा स्विकार केला. पूढे '' दरेकाने - दरेकास दीक्षा द्या!'' असा संदेश दिला. हा संदेश घेवून पा लाख लोक संपूर्ण भारतभर दीक्षा समारंभास पूर्णत्व देवू लागले १९५६ ते १९५८ या कालखंडात मोठया प्रमाणात भारतात येथील अस्पृश्य समाजांनी हिंदू धर्माचा त्याग करूण बौद्ध धम्माचा स्विकार केला.

'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर करे पूकार

'' बौद्ध धम्म का करे स्विकार'' अशी एक नवीन परिवर्तणाची घोषणा भारतीय समाजास प्राप्त झाली. जिकडे - तिकडे बौद्ध विचाराचे वारे वाहण्यास प्रारंभ झाला. शतकानुशतके धर्मापासुन वंचीत असलेल्या भारतीय अस्पृश्य समाजास जगप्रसिद्ध ''बौद्ध धम्म'' प्राप्त झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मचक्र परिवर्तणाच्या प्रभावाने अनेक शतकानंतर प्राचीन भारतीय बौद्ध धम्मास एकाच क्षणी पाच लाख ''बौद्धानुयायी प्राप्त झाले. बौद्ध धम्माचा स्विकारामुळे भारतीय अस्पृश्य समाजात सामाजिक, सांस्कृतीक शैक्षणिक, धार्मिक आणि राजकीय जीवनात संपूर्ण सकारात्मक बदल झाला. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळाणे 'अस्पृश्यना निवारण' कायदा संमत केला. भारतीय अस्पृशांना अस्पृश्यत्वाचा त्याग करून मानव म्हणून जीवन जगण्यास बौद्ध धम्म स्वरूप विषाल मार्ग प्राप्त झाला.

*प्रथम भारतीय बोधिसत्वः*

'न भुतो न भविष्यती' अशी धम्मक्रांती डॉ. बाबासाहेबांनी राजा सम्राट अशोकानंतर भारतात घडवून आणली. डॉ. बाबासाहेबांच्या प्रभावाने प्रभावीत होवून पाच लाख भारतीय जनतेने बौद्ध धम्माचा स्विकार केला. परंतू एकही रक्ताचा थेंब न सांडता. एकही रक्ताचा थेंब न सांडता पाच लाख लोकांचे, एकाच क्षणी धर्मंतर ही या इतिहासातील एकमेव घटना आहे. भगवान बुद्ध, राजा सम्राट चक्रवर्ती धम्म अशोक राजा, आणि बोधिसत्व डॉ. बाबासहेब आंबेडकर यांच्या धम्मचक्रपरिवर्तनाने समग्र मानवी समाजास एक नवीन दिशा प्राप्त झाली.

डॉ. बाबासहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीने भगवान बुद्ध स्थापीत 'धम्मा चक्र' गतीमान झाले. आणि म्हणून १९५६ साली काठमांडू, नेपाळ येथे झालेल्या जागतीक बौद्ध धम्म परिषदेत' जगातीक विद्वन बौद्ध भिक्खु संघानी डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांस 'बोधिसत्व' ही बौद्ध इतिहासातील अतिमहत्वाची श्रेष्ठ पदवी बहाल केली. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण विश्वात एक बोधिसत्व क्रांतीकारी व्यक्तीमत्व म्हणून सन्माण झाला.

डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धर्मांतरांचे भारतीय समाजावर झालेले सकारात्मक दुरगामी परिणामः

पं.पू. बोधिसत्व, भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर मुक्कामी पाच लाख अनुयांयांसह बौद्ध धम्माची दीक्षा गृहण करून 'धर्मांतर' केले. त्या ऐतिहासिक घटनेस आज ५६ वर्ष पूर्ण होते आहोत.

मागील ५६ वर्षाचा धर्मांतरीत भारतीय बौद्ध समाजाचा परिवर्तण आलेख आपण पाहीला तर आपला लक्षात येईल. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, औद्योगिक, शेती, व्यापार, साहित्य, कला, अध्यात्म संशोधन, राजकारण, देश सेवा सुरक्षा हया संबंध क्षेत्रात धर्मांतरीत आजाचा बौद्ध आपले स्वतंत्र स्थाण टिकवून आहे. स्वतंत्र भारताच्या सर्वांगीन विकासामंध्ये भारतीय बौद्धांचा सहभाग आहे. मागील ५६ वर्षात अनेक विचारांच्या अन्य जनास प्रत्यक्ष स्वरूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मांतराने प्रभावीत केले आहे.

आज भारतीय बौद्ध म्हणून एक अढळ स्थाण भारतीय समाज व्यवस्थेत निर्माण झाले आहे. याच प्रत्यक्ष अनुभवाने डॉ. बौधिसत्व बी.आर. आंबेडकर हे आधुनिक भारतीय बौद्ध पुनरूत्थानाचे 'जनक' आहेत.

*संदर्भः–*

१) वा. गो. आपटे, बौद्ध धर्माचा इतिहास बौद्ध पर्व, कौशल्य प्रकाशन, २००२, औरंगाबाद पृ.कं. ३०–३१.
२) कित्ता, पृ.कं. ६३
३) कित्ता, पृ.कं. १३१
४) मा. शं. मोरे, बौद्ध धम्माचे मूळ सिद्धांत, कौशल्य प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००६, औरंगाबाद, पृ.कं. ४८–४६
५) कित्ता, पृ.कं. ८०
६) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, बुद्ध आणि त्यांचा धम्म, सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई, १९९५, पृ.कं. भाग १, २/६१.
७) कित्ता, पृ.कं. २४७
८) कित्ता, पृ.कं. २६६
९) डॉ. संदेश वाघ, बौद्ध धर्म आणि जैन धर्माचा इतिहास (इ.स. १०००), प्रकाशक प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्यावन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई पृ.कं. १५, १६
१०) कित्ता, पृ.कं. ७० – ७४
११) कित्ता, पृ.कं. ६०